**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2016 = 6.17, www.srjis.com*
*UGC Approved Sr. No.49366, JAN–FEB, 2018, VOL- 5/43*

# जीवन कौशल्य आणि शिक्षण

**Kamble Jotsna Mohan, Ph. D.**
*Assistant Professor, Tilak College of Education, Pune- 30*
*jotsnasonawane@gmail.com*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

माणूस जन्माला येतो व मृत्यूपर्यंत जगत असतो जन्म आणि मृत्यू यातील काळाला आपण जीवन असे म्हणतात. कोणाला जीवन बगीच्या सारखे सुंदर वाटते तर कोणालाही जीवन रखरखीत वाळवंटात सारखे वाटते ,नदी सारखे वाटते तर कोणाला हे जीवन वादळासारखे वाटते.

सगळेच जीवन जगतात पण प्रत्येकाची जगण्याची पद्धत निराळी आहे. माणूस जीवन कसा जगला हे जीवनाच्या अंतिम समयी कळते .त्याने आपल्या जीवनाचे सार्थक केले की आपले जीवन फुकट घालवले जीवन कसे जगावे हा प्रत्येकाचा वैयक्तिक प्रश्न असला तरी माणूस हा समाजशील प्राणी आहे त्यामुळे त्याने जगताना मनुष्य धर्माचा विचार करावा. मानव जातीचा विचार करावा.

माणूस जसा विकसीत झाला तसे त्याने शिक्षण शोधून काढले व आता त्या शिक्षणातून माणूस घडला पाहिजे ही आपली अपेक्षा आहे. हा माणूस घडण्या करता त्याच्यामध्ये काही जीवन कौशल्य असणे आवश्यक आहे ही जीवन कौशल्य त्याला प्रयत्नपूर्वक स्वतःमध्ये विकसित करावी लागतील तेव्हा त्याचे जीवन परिपूर्ण होणार आहे आणि त्याकरता त्याला प्रयत्नपूर्वक आपले व्यक्तिमत्त्व घडवावे लागेल. चांगल्या व्यक्तीमत्वा करता व्यक्तीच्या तसेच समाजाच्या दृष्टीने ज्या कौशल्यांची गरज आहे त्या कौशल्यांचा विचार आपण इथे करूया.

सध्याचे युग हे प्रचंड स्पर्धेचे युग आहे केवळ पदवी घेऊन चालत नाही तर त्याबरोबर काही कौशल्य आत्मसात केल्यास त्याचा जास्त फायदा होतो. स्पर्धातर प्रचंड आहे या स्पर्धेच्या काळात आपल्याला काम करायचे आहे आपण रोज टीव्हीवर बघतोय मोठमोठ्या कंपन्या या स्पर्धेमध्ये टिकण्यासाठी किंवा ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी कितीतरी मोठ्या प्रमाणात जाहिराती करतात एक खरेदी करा एक त्यावर फुकट् घ्या, हया पासून तर या मालावर इतके टक्के सूट पैशाच्या स्वरूपात अश्या जाहिरातीआपण रोज वाचतो व विविध चैनल वर पाहतो.

हे सगळे करण्यामागे हजारो लोकांचे हात असतात आणि हे करत असताना व्यक्तिमत्त्व विकासामध्ये येणारे अनेक गुण जे प्रत्येकाच्या आत दडलेले असतात या या गुणांचा फायदा या हजारो

लोकांना होत असतो हे गुण ओळखून या गुणांचा आपण प्रभावीपणे वापर केल्यास त्याचा उपयोग औद्योगिक क्षेत्रात, कंपनी क्षेत्रात, शैक्षणिक क्षेत्रात, सामाजिक क्षेत्रात, उपयोग खूप मोठ्या प्रमाणात होतो व्यक्तिमत्व विकासात जीवन कौशल्य आवश्यक आहेत ती खालील प्रमाणे.

प्रभावी वक्तृत्व कौशल्य

श्रवण कौशल्य

ध्येय निश्चित करण्याचे कौशल्य

वेळचे व्यवस्थापन करण्याचे कौशल्य

नेतृत्व कौशल्य

निर्णय कौशल्य

संवाद कौशल्य

प्रेरणा देण्याचे कौशल्य

सकारात्मक विचार करण्याचे कौशल्य

अर्थात याचबरोबर धाडस, जिद्द, आत्मविश्वास, इच्छाशक्ती ,चिकाटी ,सातत्य ,दूरदृष्टी, कल्पकता,समयसूचकता, प्रामाणिकपणा, नम्रता, नियोजन, व सगळ्यात महत्त्वाचे शारीरिक व मानसिक स्वास्थ्य या अतिशय महत्त्वाच्या गोष्टीचा समावेश आहे.

**1) प्रभावी वक्तृत्व कला** -

स्पर्धेच्या प्रचंड जगात आपण जेव्हा एखाद्या कंपनी बरोबर पर्यटनाला जातो तेव्हा अनोळखी पाच-पन्नास लोकांमध्ये आपले नाव पत्ता आपले गुण आत्मविश्वासाने सांगत नसू तर एखाद्या मुलाखतीत आपण कसे उत्तर देणार ,गटात सहभागी कसे सहभागी होणार ?बँकेच्या अधिकार्यांना आपले म्हणणे पटवून कसे देणार? आपण तयार केलेल्या वस्तूची सादरीकरण कसे देणार ?आपल्यासारख्या दहा वस्तू बाजारात मिळत असताना माझीच वस्तू श्रेष्ठ आहे हे कसे सांगणार? इंग्रजी माध्यमाच्या शाळांच्या बाबतीत मराठी माध्यमाच्या शाळेचे महत्त्व पालकांना कसे पटवून देणार?आपल्या अधिकारी समोर आपली बाजू आत्मविश्वासाने कशी मांडणार? आपल्यावर होणारा अन्याय आपण कसं सांगणार? असेअनेक प्रश्न आपल्यासमोर आहे. फक्त वक्तृत्वाच्या जोरावर जग जिंकता येतं असा समज आहे तो अनेक व्यक्तीने आपल्या भारतासारख्या विकसनशील देशात मध्ये सुद्धा खरा ठरवून दिलेला आहे.

वक्तृत्व हे कोणी काही जन्मजात घेऊन येत नाही हे सामर्थ्य आपल्याला आत्मसात करावे लागते आयुष्याच्या प्रत्येक वळणावर आपल्याला बोलावेच लागते आणि प्रभावी बोलण्यामुळे अनेक गोष्टी आपण सहज साध्य करू शकतो पण त्यासाठी ध्यास घ्यावा लागतो.जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतील, संधी

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

शोधावी लागेल आणि मिळालेल्या संधीचं सोनं मनात कायम सकारात्मक विचार आणावा लागेल.आपल्याला खूप प्रयत्न करावे लागतील हे कौशल्य असे आहे की जे आपल्या जीवनात जागोजागी उपयोगी येणारे आहे.

**2) श्रवण कौशल्य-**

ज्ञान मिळवत राहणे आणि माणसाचा स्थायीभाव आहे तेव्हा इतरांचे विचार आहे की हे अतिशय महत्त्वाचे आहे ते विचार तुम्हाला पटोअथवा ना पटो ते आपल्याला ऐकावी लागतात

व्यक्तिगत जीवनात व सार्वजनिक जीवनात प्रत्येकाला इतरांच्या मतांचा विचार करूनच पुढे जावे लागते अर्धवट चुकीच्या माहिती मुळेआर्थिक कौटुंबिक व सामाजिक नुकसान होत असते.सर्वच माहिती लेखी देता येते असे नाही सार्वजनिक सभांमध्ये किंवा घरात चर्चा हाच निर्णय प्रक्रियेचा प्राण असतो. चर्चा योग्य रीतीने व्हावी यासाठी सर्व सभासदांची मते ऐकून त्याप्रमाणे मतदान गेले हा मार्ग बहुतेक करून वापरला जातो.सर्वांचे विचार करण्यासाठी त्यांचे म्हणणे योग्य प्रकारे ऐकणे जरुरीचे आहे. त्याकरता उत्तम श्रवण कौशल्य आपल्याकडे असणे अतिशय महत्त्वाचे असते.जरूर चांगल्या कानांची नाही तर जरूर आहे तिची मला काही ऐकायचं आहे मला काही ज्ञान मिळणार आहे हा विचार जेव्हा आपल्या मनात येतो तेव्हाच प्रभावी श्रवण याची सुरुवात होते.

**3) ध्येय निश्चित करण्याचे कौशल्य -**

पेट्रोल पंपावर काम करणारा मुलगा पेट्रोलियम कंपनी चा कारखाना काढण्याची ही निश्चित करतो व मोठी पेट्रोलियम कंपनी काढतो ते धीरूभाई अंबानी पाहिले. प्रयत्न केले तर कोणतीच गोष्ट अशक्य नाही म्हणून समर्थ म्हणतात यत्न तो देव जाणावा, प्रयत्नांती परमेश्वर ,तर आपण आपल्या निश्चित ठिकाणी पोहोचू हे नक्की.

**4) वेळेचे व्यवस्थापन कौशल्य-**

जगाचा गेल्या अनेक वर्षांचा इतिहास जर आपण पाहिला तर असं दिसतं की वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये लोकांनी प्रचंड यश कमावले आहे त्या सर्व लोकांमध्ये एक गोष्ट मात्र सारखी होती ती म्हणजे त्यांनी वेळेचे प्रभावी व्यवस्थापन केले होते.पण आज आपण पाहतो आपल्यामध्ये वेळेचे महत्व पाहिजे तसे बिंबवले जात नाही.कोणतेही काम वेळेवर न करण्याचा जणू आम्ही विडाच उचललाय .कोणत्या कार्यक्रमाची वेळ असते त्या वेळेवर कधीही कार्यक्रम सुरू होत नाही यामुळे लोकांचा समज झालेला आहे की आठ चा कार्यक्रम आहे ना मग साडेआठ पर्यंत जायला हरकत नाही.एवढेच कशाला आपला सोनार, शिंपी,फर्निचर बनवणारा,कधी वेळेवर आपलं काम करून देत नाही.चार चकरा मारल्या शिवाय आपलं काम होतच नाही म्हणून असं वाटतं प्रत्येकाने आपली वेळ पाळली तर ते सगळ्यांच्या सोयीचे होते. पेट्रोल फुकट खर्च होते

Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

व मनस्ताप होतो तो वेगळाच. नेहमीच आपण आपली वेळ पाळली दुसऱ्याची वेळ सांभाळली तर ते सगळ्यांना सोयीचे होईल कोणाचाही खोळंबा होणार नाही.

**5) निरीक्षण कौशल्य -**

उत्तम निरीक्षक असल्याचा फायदा आपल्या प्रमाणे आपल्याशी संबंधित कार्यालयाला होतो. जगामध्ये आतापर्यंत हजारो शोध लागले या शोधत अर्ध्याहून जास्त शोध हे निव्वळ निरीक्षणातून लागलेले आहेत असे सांगितले जाते. झाडावरून खाली पडणारे सफरचंद सगळेच बघतात न्यूटनच्या निरीक्षणातून ते गुरुत्वाकर्षणाचा शोध लावला .आंघोळ करताना पाणी बाहेर पडताना सगळ्यांनी बघितले पण आर्किमिडीजने त्यावरून शोधून काढले ते आज आर्किमिडीजचे तत्व म्हणून प्रसिद्ध आहे . निरीक्षणामुळे जिज्ञासा निर्माण होते त्या कुतूहलातून प्रश्नांचा मागोवा घेण्याची सवय लागते आणि यातूनच उत्तर मिळते. अनेक लहान-मोठया समस्यांची सोडवणूक करण्यासाठी निरीक्षण कौशल्य आहे. उत्तम उपाय म्हणून सिद्ध झालेला आहे.निरीक्षण कौशल्य आत्मसात केल्यानेअनेक लाभ होतात.

**6) नेतृत्व कौशल्य-**

नेता म्हणजे पुढे नेणारा नेता हा शब्द आपल्या कानावर पडलं की आपल्यासमोर राजकीय पुढाऱ्यांची व्यक्तिमत्त्व उभे राहते पण वस्तुस्थिती तशी नाही घरी शाळेत विविध कंपन्यांमध्ये आणि संस्थाप्रमुख यांमध्ये प्रभावी नेतृत्व गुण असावे लागतात प्रत्येक टीमचा जसा कॅप्टन आधार असतो तसे घरी आई किंवा वडील व शाळेचे हेडमास्तर हे कर्णधार असतात. प्रभावी नेतृत्व गुण सर्व खरे असतेच असे नाही तो गुण विकसित करावा लागतो त्याकरता कष्ट घ्यावे लागतात आपण अगदी नेताजी सुभाष चंद्र बोस सारखे किंवा महात्मा गांधी सारखे उत्कृष्ट दर्जाचे संघटक बनवायला हवं असं मुळीच नाही लोकांवर प्रभाव टाकण्याची क्षमता आणि व्यवस्थापनाचे कौशल्य अंगात असेल तर आपणही नेतृत्व करू शकतो संस्थेच्या किंवा संघटनेच्या कामात सर्वांना बरोबर घेऊन जाणेअपेक्षित असते.

**7) निर्णय घेण्याचे कौशल्य--**

आपल्या मध्ये एखादी उणिव असेल तर ते दूर करण्याचा आपण आटोकाट प्रयत्न करावा समजा ती उद्या आपल्याला दूर करताच नाही आली तर आयुष्य संपत नाही . कोणताही निर्णय घेताना मन अतिशय स्थिर ठेवा गोंधळून जाऊ नका .मन शांत ठेवून खूप विचार करून निर्णय घ्या कोणताही निर्णय रागाच्याभरात अजिबात घ्यायचा नाही नाहीतर पश्चातापाची वेळ येते.त्याच्यावर विश्वास होता. चूक आपली आहे हे कबूल करणे म्हणजे मनस्ताप कमी होतो व भविष्यात खूप सतर्क राहावे.

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**8) प्रभावी सुसंवाद कौशल्य-**

सध्या तंत्रज्ञानाचा महास्फोट झाला आहे. तांत्रिक च्या क्षेत्राने या दशकात वेगाने भरारी मारली आहे व त्यात रोज नवनवीन गोष्टींची भर पडत आहे.सकाळी लागलेले शोध संध्याकाळपर्यंत जुने होत आहे.दर दिवशी येणार्या गाड्या दर दिवशी येणारे नवनवीन फोन ,दर दिवशी येणारे नवनवीन टीव्ही ,आपल्याला शांततेने जगू देत नाही. माणसाला सततअसमाधानी ठेवण्याचे काम सध्या मार्केट किंवा बाजार करत आहे .मागील काही शतकांत पेक्षा किंवा दशकांपेक्षा पुढे येणारे प्रत्येक वर्षी माणसाला जास्त वेगाने पुढे घेऊन जाणार आहे.मोबाईल ,कॉम्प्युटर, वेबसाईट,ईमेल सारख्या संवाद तंत्रज्ञानाचा वेग हा थक्क करून सोडणारा आहे परंतु हे तंत्रज्ञान केवळ श्रीमंत पुरतीच किंवा शहरात पुरतीच मर्यादित राहिलेली नाही तर सर्वसामान्य गरीब खेड्यातील व्यक्तीसुद्धा आज या साधनांची परिचित झालेली आहे.आज काल आपल्या इकडे दूध वाल्याकडे भाजीवाल्याकडे सगळ्यांकडे मोबाईल असल्याचे दिसते हे कितीही तंत्रज्ञान क्षेत्रात पुढे गेले तरी माणसा माणसातील संवाद हा करावाच लागेल कारण काम करत असताना संवाद जेवढा थेट व स्पष्ट असेल तितकी परिणामकारकता जास्त कारण समज गैरसमज दुरावा यातूनच कार्यनाश होतो.अडथळे येतात वेग मंदावतो त्यामुळे संपर्कात येणाऱ्या व्यक्तींशी आपला सुसंवाद असणे फारच गरजेचे झाले आहे. परंतु असे लक्षात येते की सुसंवादाची साधने जेवढी वाढली तेवढाच माणूस माणसापासून दूर गेला असं वाटतं हा भावनिक दुरावा योग्य नाही. सुसंवाद नसल्यामुळे कोण कुठल्या अडचणीत आहे हे इतरांना कळत नाही.मुलगा किंवा मुलगी आत्महत्या करतात तेव्हा आई-वडिलांनाही कळतं अशी भयानक परिस्थिती निर्माण झाले हे बदलायचं असेल तर सुसंवादाची गरज आहे.

**9) प्रेरणा देण्याचे कौशल्य-**

मार्गदर्शन किंवा एखाद्याचा स्पर्श एखाद्या शब्द माणसाला खूप काही शिकवून जातो . कणा ही कविता हेच आपल्याला सांगते, एक विद्यार्थी आपल्या शिक्षकांना बऱ्याच वर्षांनी माझ्या पाठीवर हात ठेवला आणि मला लढ म्हणा एवढेच माझ्याकरता आहे .काही करण्याकरता जेव्हा प्रेरणा मिळते तोच उचित मुहूर्त किती वेळ इतर सफलता मिळते म्हणून आपल्या च्या संपर्कात आलेल्या व्यक्तींकडून विविध प्रकारच्या प्रेरणा मिळते आणि आपल्याकडून इतरांनाही प्रेरणा मिळणे अतिशय गरजेचे आहे.

**10) सकारात्मक दृष्टिकोनाचे कौशल्य-**

माणूस आयुष्यात यशस्वी होऊ शकतो ते दोन गोष्टींमुळे एक प्रचंड इच्छाशक्ती व सकारात्मक दृष्टिकोन कितीही अडचणी आल्या तरी इच्छाशक्तीच्या जोरावर त्या अडचणीवर माणूस मात करू शकतो.सकारात्मक दृष्टिकोन कोणत्याही परिस्थितीत बदलायचा नाही .अपयश आले तरी सकारात्मक दृष्टिकोन सोडायचा नाही.अपयश शब्दामध्येच यश शब्द दडलेला आहे आणि हीच भावना प्रत्येकाला

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

आपल्यालला बाहेर पडण्याची प्रेरणा देत असते. अडचण मना अपयश मना छोटी असू दे किंवा मोठी असू दे आपण कायम सकारात्मक विचार करावा व सकारात्मक विचार करण्याचे कौशल्य आपल्यामध्ये निर्माण व्हावे माणसाचे जीवन अत्यंत अडचणी भरलेले असते.आपल्याला कधी कधी चांगल्या संधी मिळतात पण आपण जोखीम घ्यायला घाबरतो म्हणून आपल्याला येत नाही नकारात्मक विचार करण्याची सवय आपण सोडली पाहिजे.अशा प्रकारे आपले जीवन यशस्वी करायची असेल तर वर सांगितलेली 10 कौशल्य आपल्या जीवनात आपण प्राप्त केली पाहिजेत.

**संदर्भ**---

*शिक्षण समीक्षा नियतकालिक*
*विवेक साप्ताहिक अंक22 जून ते 28 जून 2014*
*शैक्षणिक समस्या . लीला पाटील .*

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*